# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**बेकायदा स्पर्धा परिक्षांवर आळा घालणेबाबत**

**(१) ३५९३० (२३-०१-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाची कोणतीही मान्यता नसलेल्या व शिक्षणाचा खुलेआम बाजार मांडलेल्या बेकायदा स्पर्धा परिक्षांवर बंदी आणावी तसेच उक्त परिक्षाकरिता शिक्षक व शाळांची इमारत वापरु नये अशी मागणी प्राथमिक शिक्षक संघातर्फे शासनाकडे करणेत आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा बेकायदा स्पर्धा परिक्षांवर आळा घालणेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (३१-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शैक्षणिक संस्थातील शिक्षकांच्या भरतीवरील बंदी उठवण्याबाबत**

**(२) ४९५२६ (२०-०६-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शैक्षणिक संस्थातील शिक्षकांच्या भरतीवरील बंदी उठवली जाईल अशी घोषणा मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या सुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घोषणेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, शिक्षक भरतीमध्ये अतिरिक्त शिक्षकांना सामावून घेणार आहेत काय,
(४) असल्यास, याची अंमलबाजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-०६-२०१८) :** (१) होय.
(२) शासन पत्र दिनांक ६.२.२०१६ आणि दिनांक ९.२.२०१६ अन्वये शिक्षकांच्या भरतीवरील बंदी उठविण्यात आलेली आहे
(३) व (४) रिक्त पदावर अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन केल्यानंतरच शिक्षकभरती करण्याचे शासन धोरण आहे या करीता दि.२३.६.२०१७ च्या शासन निर्णय नुसार कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जिंतूर (जि.परभणी) येथील नूतन शाळा बांधकामाबाबत

**(३) ६२६३३ (२२-०८-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिंतूर (जि.परभणी) येथील नूतन शाळा बांधकामासाठी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २००९ ते २०११ या काळात निधी प्राप्त झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती निधी प्राप्त झाला आहे. प्राप्त निधीनुसार शाळेचे बांधकाम झालेले नाही ही बाब निदर्शनास आल्यामुळे गटशिक्षणाधिकारी, जिंतूर यांनी संबंधितांवर गुन्हा दाखल करुन रक्कम परत जमा करणेसंदर्भात आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३१-०५-२०१८) :** (१) नाही.
(२) व (३) सदर बांधकामासाठी एकूण रु.१४.८५ लक्ष निधी प्राप्त झाला होता. परंतु शाळेचे बांधकाम न झाल्याने गटशिक्षणाधिकारी, जिंतूर यांनी संबंधितांवर गुन्हा दाखल केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### लातूरच्या अपंग अभ्यास केंद्राच्या इमारतीचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(४) ७४६२१ (१४-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील बार्शी रोडवर जिल्हा परिषद शाळेच्या आवारात भरण्यात येत असलेल्या अपंग अभ्यास केंद्राच्या इमारतीचे काम निधी अभावी प्रलंबित असून या इमारतीचा गैरवापर होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या इमारतीच्या बांधकामासाठी १० लाख रुपयांचा निधी सन २०११ व २०१२ मध्ये देण्यात आला होता या निधीतून इमारतीचे काम पूर्ण झाले नाही व उर्वरित ६ लाख रुपयांचा निधी न मिळाल्याने इमारत अपूर्णावस्थेत राहिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शाळेच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी निधी देण्याबाबत व इमारतीचे बांधकाम अपूर्ण ठेवणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सदर अर्धवट इमारतीचा गैरवापर होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) अंशत: खरे आहे.

लातूर येथील अपंग अभ्यास केंद्राच्या इमारतीच्या बांधकामासाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत सन २०१०-११ मध्ये रु.१३.५० लक्ष निधी मंजूर करण्यात आला. मंजूर आराखडयानुसार सदर बांधकामावर रु.१३.२० लक्ष निधी खर्च झाला आहे. जिल्हा परिषद सेस फंड, DPDC / C.S.R., मधून निधी प्राप्त करुन घेऊन उर्वरित बांधकाम पूर्ण करण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहमदनगर येथील सनफार्मा उच्च माध्यमिक विद्‌यालयातील विद्‌यार्थ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला झाल्याबाबत

**(५) ७६२९५ (२०-०४-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील एमआयडीसी जवळ असलेल्या सनफार्मा उच्च माध्यमिक विद्‌यालयात १२ वीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या दीपक नवनाथ पुंड वय वर्ष १७ (राहणार राघवेंद्र स्वामी नारायण मंदिराजवळ, बोल्हेगाव, अहमदनगर) याचा दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी शाळेतील बेंचवरून पडल्यामुळे मृत्यू झाला असल्याचे दिनांक २९ डिसेंबर,२०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्गात सराव पेपर सुरु असताना शिक्षकाच्या भीतीने बेंच वरून मागे सरकल्याने खाली पडून डोक्याला मार लागल्याने उपचारादरम्यान मृत्यू झाला असून त्यास शिक्षक जबाबदार असल्याचे पालकांचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली काय व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय,
चौकशीअंती संबंधित शिक्षक जबाबदार नसल्याचे दिसून येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात "अन्नसुरक्षा कायदा २०११" अंतर्गत एकाही अनधिकृत कत्तलखान्यावर कारवाई झाली नसल्याबाबत

**(६) ८९३४८ (२१-०८-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कत्तलखान्यांची नोंद ही संबंधित महानगरपालिका, नगरपालिका आदी स्थानिक स्वराज्य संस्थांनी करणे तसेच अन्नसुरक्षा कायद्यांतर्गत करण्यात येणारी नोंदणी अन्न व औषध प्रशासनाकडे करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील एकाही अनधिकृत कत्तलखान्यावर "अन्नसुरक्षा कायदा २०११" अंतर्गत कारवाई झाली नसल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,पाच मोठी जनावरे, पाच बकरे तसेच पन्नासपेक्षा जास्त कोंबडयांची कत्तल केली जाते त्यांना अन्न व औषध प्रशासनाकडून परवाने घेणे अत्यावश्यक आहे असे परवाने ज्यांच्याकडे नाही त्यांच्यावर एक लाख रुपयांपर्यंत दंड व खटला भरण्याची तरतूद कायद्यात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईत साडेचार हजार अनधिकृत कत्तलखाने असून त्यामध्ये बोकड व कोंबडयांची बेकायदेशीर कत्तल राजरोसपणे होत असतांना मुंबई महापालिका व अन्न व औषध प्रशासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार अन्नसुरक्षा कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली व उक्त अनधिकृत कत्तलखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२९-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दि.२१.०५.२०१७ रोजी दै.लोकसत्ता मध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती. तथापि, ही वस्तुस्थिती नाही.

(३) अन्न सुरक्षा कायदा, कलम ३१(२) अन्वये २ मोठी जनावरे, १० लहान जनावरे किंवा ५० पोल्टी बर्डस इतकी क्षमता असलेल्या आस्थापनांनी नोंदणी घेणे आवश्यक आहे.

सदर कायद्यातील कलम ६९ अन्वये नोंदणी धारकांना कायद्यातील उल्लंघनाबाबत रुपये १ लाख पर्यंत तडजोड शुल्क आकारण्याची तरतुद आहे.

(४) व (५) अनधिकृत कत्तलखान्याबाबत प्रशासनाकडे नोंद नाही. तथापि, बृहन्मुंबई विभागामध्ये विना परवाना कत्तलखाने/मांस/मच्छी विक्री केंद्र सुरु राहू नये याबाबत दक्ष राहण्याच्या प्रशासनाने अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. तसेच सदर प्रकरणी सक्त कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासनामार्फत देण्यात आले आहे.

बृहन्मुंबई विभागात ४३४ लहान नोंदणीधारक अन्न व्यवसाय धारकांना नोंदणी प्रमाणपत्र दिलेले आहे. विभागातील १५ मटण दुकानांवर कारवाई करण्यात आली असून रुपये ३४,४००/- दंड आकारण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील २१५५७ शांळामध्ये शौचालयाचा वापर होत नसल्याबाबत

**(७) ९०५७१ (२३-०८-२०१७). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २१५५७ शांळामधील मुला-मुलींचे शौचालये वापरात नाहीत व १११४८ शाळांमध्ये आजही विद्यार्थ्यांना हात धुण्याची सुविधा उपलब्ध नाही अशी माहिती यु डायस अहवालातून निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

U-DISE Data सन २०१७-१८ नुसार शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी अनुदानित व खाजगी विनाअनुदानित एकूण १०६५३७ शाळांपैकी ९६०६० शाळांमध्ये मुलांचे स्वच्छतागृहे वापरात असून, ९९६४३ शाळांमध्ये मुलींचे स्वच्छतागृहे वापरात आहेत. मुलांची - मुलींची ११८३० स्वच्छतागृहे वापरात नाहीत.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत मंजूर देखभाल दुरूस्ती अनुदानाच्या रक्कमेतून स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) येथे मुस्लिम कल्चरल सेंटरची निर्मिती करण्याबाबत**

**(८) ९५६८४ (२९-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथील अल्पसंख्यांक समुदायातील मुस्लिम समाजाच्या विकासासाठी व त्यांना रोजगार स्वयंरोजगाराच्या मार्गदर्शनासाठी मुस्लिम कल्चरल सेंटरची निर्मिती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) होय.

(२) अल्पसंख्याक समाजाचा विकास करण्यासाठी या विभागामार्फत, राज्यातील ४३ अल्पसंख्याक बहुल भागातील विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत दुसरी/तिसरी पाळी सुरु करणे, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना, अल्पसंख्याक मुलां/मुलींसाठी वसतीगृहे, राज्यातील अल्पसंख्याक लोकसमूहातील उमेदवारांना शासकीय/ निमशासकीय सेवेत संधी उपलब्ध करण्याकरिता केंद्रीय लोकसेवा आयोग/महाराष्ट्र लोकसेवा आयोग/बँकीग सेवा इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी तसेच व्यवसायिक अभ्यासक्रमामधील प्रवेशाकरिता घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी आणि इयत्ता १० वी व १२ वी अनुत्तीर्ण अल्पसंख्याक उमेदवारांकरिता “मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबंध्द योजना”, रोजगाराभिमूख प्रशिक्षण फी प्रतिपूर्ती योजना, पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण, स्वयंरोजगारासाठी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून कर्ज उपलब्ध करुन देण्याची योजना, अशा विविध योजना राबविण्यात येत आहेत. तथापि, या उद्दीष्टाकरिता “मुस्लीम कल्चरल सेंटर” च्या निर्मिती करण्याविषयीची कोणतीही योजना सद्य:स्थितीत अस्तित्वात नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथील जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(९) ९९००४ (२९-१२-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा क्रीडा अधिकारी (जि.अकोला) यांची शासकीय कामाप्रती गैरवर्तणूक व गैरकारभाराबाबत कारवाई करण्यासाठी शासनाने पत्र क्र.संकीर्ण-१७१७/सं.क्र.३३/ क्रीयुसे-२ दिनांक २१ जानेवारी, २०१७ नुसार आयुक्त क्रीडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पुणे, यांना अहवाल सादर करण्यास आदेशित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवाल आयुक्तांमार्फत अद्यापही शासनाला सादर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०५-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) नाही.

तत्कालीन जिल्हा क्रीडा अधिकारी, अकोला यांनी जाणीवपूर्वक गैरवर्तणूक केली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. दरम्यानच्या कालावधीत शासनाने संबंधितांची जिल्हा क्रीडा अधिकारी, अकोला या पदावरुन जिल्हा क्रीडा अधिकारी, बुलढाणा या पदावर बदली केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आंतरराष्ट्रीय क्षेत्रात विविध खेळात अतुलनीय कामगिरी केलेल्या खेळाडूंना जाहिर केलेली बक्षीसे देण्यात आली नसल्याबाबत

**(१०) १००९२१ (२९-१२-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय क्षेत्रात विविध खेळात अतुलनीय कामगिरी केलेल्या खेळाडूंना जाहिर केलेली पारितोषिके वित्त विभागाची मान्यता नसल्यामुळे देण्यात आली नसल्याने १२३ खेळाडूंची रुपये ५ कोटीपेक्षा जास्त पारितोषिकांची रक्कम शासनाने थकविली असल्याची बाब दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास, निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिला विश्वचषक क्रिकेट मध्ये अंतिम स्पर्धेत पोहोचलेल्या संघातील महाराष्ट्रीयन खेळाडूंना विधानसभेत सन्मानीत करताना प्रत्येक खेळाडूला ५० लाख रुपये माहे जुलै, २०१७ मध्ये जाहिर करण्यात येणे, २०१५ मध्ये केरळ येथील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत खो-खो खेळात सुवर्णपदक जिंकणाऱ्या संघास व शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंना जाहिर केलेले सात लाख अशा प्रकारे १२३ खेळाडूंचे रुपये ५ कोटी २० लाख इतकी पारितोषिकांची रक्कम अद्यापी त्यांना मिळाली नाही अशा स्वरुपाची लेखी तक्रार ऑलिम्पिक संघटनेने राज्य शासनाला नऊ वेळा स्मरणपत्रे पाठवून केली असून मा.अर्थ मंत्री यांना भेटून निवेदने देण्यात येऊन खेळाडूंना पारितोषिकांची रक्कम मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेतील राज्याच्या पदकप्राप्त खेळाडूंना दयावयाच्या रोख पारितोषिकांच्या विचाराधीन असलेल्या सुधारित प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, शासनाने उक्त विचाराधीन प्रस्तावावर निर्णय घेतला असल्यास, खेळाडूंची थकीत असलेली रक्कम लवकरात लवकर देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०५-२०१८) :** (१) होय.
(२), (३)व (४) दि.२८ सप्टेंबर,२०१७ रोजी पार पडलेल्या सत्कार समारंभात महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील उपविजेत्या संघामधील महाराष्ट्रातील महिला खेळाडूंना प्रत्येकी रु.५० लक्ष इतकी रोख रक्कम अदा करुन गौरविण्यात आले आहे. केरळ येथील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूंना पारितोषिके अदा करण्याकरीता शासनाने दि. ८ जानेवारी,२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्यानुसार पदक प्राप्त खेळाडूंना बक्षिसाची रक्कम आरटीजीएस प्रणालीद्वारे अदा करण्यात आली आहे.सन २०१७-१८ मध्ये पार पडलेल्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार वितरण समारंभावेळी संबंधित पुरस्कार्थींना पुरस्काराची रक्कम अदा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बाहेरचा वाडा, सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) या शाळा संस्थेच्या नवीन इमारतीमधील ५ खोल्यांचे भाडे मिळणेबाबत

**(११) १०१०५१ (२९-१२-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाहेरचा वाडा, सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील जिल्हा परिषद ऊर्दु प्राथमिक शाळा, संस्थेच्या नवीन इमारती मधील ५ खोल्यांमध्ये भरत असून जिल्हा परिषदेने, मुंबई येथील सावंतवाडी मर्कजी जमात, मुंबई या संस्थेला उक्त ५ खोल्याचे भाडे माहे जून, २०११ पासून अद्याप दिले नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने उक्त संस्थेला नवीन इमारतीच्या ५ खोल्यांचे भाडे देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) होय.
(२) प्रचलित धोरणानुसार जिल्हा परिषदांना देण्यात येणाऱ्या वेतनेतर अनुदानातून हा खर्च भागविणे अपेक्षित आहे. तथापि, सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे वेतन अनुदानाचे निर्धारण झालेले नसल्याने, सद्य:स्थितीत वेतनेतर अनुदानाचे वितरण संस्थगित आहे. यासंदर्भात आवश्यक कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आट्यापाट्या खेळाडूंना नोकर भरतीत आरक्षण मिळण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(१२) १०२१५३ (२९-१२-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आट्यापाट्या या देशी खेळणाऱ्या खेळाडूंना ५ टक्के शासकीय नोकर भरतीत आरक्षण मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीना मा.क्रीडामंत्री यांना माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०५-२०१८) :** (१) होय.

(२) शासकीय व निमशासकीय सेवेत खेळाडूंना ५टक्के आरक्षण लागू करण्यासाठी शासनाने दिनांक १ जुलै, २०१६च्या शासन निर्णयान्वये सर्व समावेशक सूचना निर्गमित केल्या आहेत. तथापि सदर शासन निर्णयामध्ये “आटयापाटया” या खेळाचा समावेश करण्याची बाब सद्यस्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यातील गुणवंत खेळाडू व क्रीडा संघटक**
**क्रीडा पुरस्कारांपासून वंचित असल्याबाबत**

**(१३) १०२४३९ (२९-१२-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या क्रीडा विभागामार्फत प्रत्येक जिल्ह्यातील खेळाडूंसह त्यांचे मार्गदर्शक व संघटकांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना पुरस्कार देऊन २६ जानेवारीला गौरव करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्ह्यात यावर्षी सदर पुरस्कारांबद्दल घोषणा अथवा वितरण झाले नसल्याने जिल्ह्यातील खेळाडू व नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०५-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

सन २०१७-१८ या वर्षासाठी उस्मानाबाद जिल्हयातील गुणवंत खेळाडूंसह, क्रीडा मार्गदर्शक व क्रीडा संघटक यांना दि.२६ जानेवारी, २०१८ रोजी पुरस्कार वितरीत करण्यात आले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय तंत्रनिकेतन मंजूर करणेबबत**

**(१४) १०२९८५ (२९-१२-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय तंत्रनिकेतन मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तंत्रनिकेतन सुरु करण्याबाबत जळगांव जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासकीय तंत्रनिकेतन सुरु करण्याची कार्यवाही सुरु झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर शासकीय तंत्रनिकेतन पीएलए मधून अग्रीम मंजूर करुन सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) होय.

दि.६ जून, २०१५ च्या शासना निर्णयान्वये अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी-विद्यार्थीनीकरिता मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(२) होय.

(३) व (४) मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय तंत्रनिकेतन बांधकामासाठी माहे मार्च, २०१८ अखेर पर्यंत शासनाने एकत्रित निधीतून (Budgetary provision) सदर शासकीय तंत्रनिकेतन इमारत बांधकामाकरिता एकूण रू.१३.२० कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील २०% अनुदान जाहीर झालेल्या १६२८ शाळांना अनुदान देण्याच्या मांगणी बाबत**

**(१५) १०३०६७ (२९-१२-२०१७). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २०% अनुदान जाहीर झालेल्या १६२८ शाळांना तातडीने अनुदान देण्याच्या मांगणीसाठी राज्य विनाअनुदानित कृती समितीने माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान आझाद मैदान, मुंबई येथे आंदोलन सुरू केले असता २५ शिक्षकांना पोलिसांनी अटक करून यापुढे आंदोलन करणार नाही असे हमीपत्र लिहून घेतले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांचा अनुदानाचा प्रश्न गत १७ वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०५-२०१८) :** (१) नाही.
(२) दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या १६२८ शाळांना शासन निर्णय, दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय, दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ अन्वये पात्र शाळांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देऊळगावमहि (जि.बुलढाणा) येथील शिवाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(१६) १०६८६९ (०६-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देऊळगावमहि (जि.बुलढाणा) येथील शिवाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना पिण्याचे शुध्द पाणी, स्वच्छतेसह भौतिक सुविधा तात्काळ उपलब्ध करुन देणेबाबतची मागणी दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे शाळा व्यवस्थापनाकडे करण्यात आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त सोयी सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
सदर खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेत भौतिक सुविधा देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.
(२) सदर शाळेत बहुतांश भौतिक सुविधा उपलब्ध आहेत. तथापि दर्जेदार सुविधा उपलब्ध करणेबाबत सूचित केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यातील पाणी पुरवठ्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करण्यासाठी इस्त्रायलच्या मेकोरोट डेव्हलपमेंट ॲण्ड एंटरप्रायजेस या शासकीय कंपनी सोबत सामंजस्य करार केला असल्याबाबत**

**(१७) १०८२३२ (१५-०४-२०१८). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील जनतेला अल्प आणि अनियमीत पर्जन्यमानामुळे सातत्याने दुष्काळाला तोंड दयावे लागत असल्यामुळे या भागात पाण्याची भीषण टंचाई लक्षात घेऊन शासनाने इस्त्रायलच्या मेकोरोट डेव्हलपमेंट ॲण्ड एंटरप्रायजेस या शासकीय कंपनी सोबत सामंजस्य करार केला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीद्वारे मराठवाडयातील पाणीपुरवठयावर उपाययोजना, सरासरी पर्जन्यमान धरणाची साठवण क्षमता, जलसंधारण, पुर्नवापर, पुनर्चक्रीकरण नदी खोऱ्यांमध्ये उपलब्ध असणारे पाणी, समुद्राचे पाणी गोडे करणे आदी प्रयत्न करण्यासाठी इस्त्रायल सरकारचे सहाय्य घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तंत्रज्ञानामुळे मराठवाडा दुष्काळ मुक्त होणार आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०६-२०१८) :** (१) होय.

मराठवाडयातील पाण्याची भीषण टंचाई लक्षात घेता शासनाने इस्त्रायलच्या मेकोरोट डेव्हलपमेंट ॲन्ड एन्टरप्रायजेस या शासकीय कंपनीसोबत दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी सामंजस्य करार केला आहे.

(२) सदर कंपनीद्वारे मराठवाडयातील पाणी पुरवठयावर परिणाम करणा-या विविध घटकांचा अभ्यास करून आवश्यक उपाययोजना सुचविण्यात येणार आहेत. प्रस्तावित उपाययोजनांचे स्वरूप साधारणत: २४ महिन्यानंतर प्राप्त व्हावयाच्या अंतिम अहवालानंतर स्पष्ट होईल.

(३) कंपनीकडून मराठवाडयातील पाण्याच्या परिस्थितीचा अभ्यास करून त्यांचेकडून अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर व्यवहार्यतेनुसार तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार आवश्यक कामे हाती घेण्यात येतील. त्यामध्ये पिण्याच्या पाण्याला प्राथमिकता देऊन त्याबाबतच्या उपाययोजना प्रथम सुचविण्याच्या सूचना कंपनीस देण्याची तजवीज ठेवलेली आहे.

(४) मेकोरोट डेव्हलपमेंट ॲन्ड एन्टरप्रायजेस या कंपनीसोबत फेब्रुवारी, २०१८ मध्ये सर्वकष करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अल्पसंख्यांक विकास कामासाठी देण्यात येणाऱ्या निधीबाबत**

**(१८) १०८५६२ (०५-०४-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांक विकास कामासाठी सन २०१५-२०१६, २०१६-२०१७, २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात एकूण किती निधी मंजूर करण्यात आला त्यापैकी प्रत्यक्षात किती निधीचे

वितरण करण्यात आले व वितरित केलेल्या निधीतून माहे डिसेंबर, २०१७ अखेर अल्पसंख्यांकाच्या विकासाची कोणकोणती कामे पूर्ण करण्यात आली आहेत,

(३) असल्यास, उक्त ३ वर्षात मंजूर केलेल्या तरतूदींपैकी संपूर्ण निधी वितरीत केला नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने तरतूद केलेली रक्कम वितरित न केल्याने अल्पसंख्याक विकासाची अनेक कामे प्रलंबित राहीली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामे लवकरात लवकर पूर्ण होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) अल्पसंख्यांक विकास कामांसाठी सन २०१५-१६ ते २०१७-१८ या कालावधीत मंजूर निधी व वितरीत निधीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | मंजूर निधी (रु.कोटीत) | वितरीत निधी(रु.कोटीत) |
|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | ४३०.४५ | ३६६.८४ |
| २ | २०१६-१७ | ४०५.०५ | ३०३.४८ |
| ३ | २०१७-१८ | ४०४.५० | २८७.८९ |

सदर वितरित करण्यात आलेल्या निधीतून अल्पसंख्यांक विकास विभागाकडून अल्पसंख्यांकांसाठी राबविण्यात येणा-या २७ विविध राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांसाठी विनियोग करण्यात आला आहे.

(२) तीन वर्षात मंजूर केलेल्या तरतूदीपैकी पूर्णपणे निधी वितरित केला नसल्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

(i) वित्त विभागाने वेळोवेळी निश्चित करुन दिलेल्या मर्यादेच्या अधिन राहून निधी वितरीत करण्यात आला आहे.

(ii) सन २०१७-१८ मध्ये केंद्रपुरस्कृत अल्पसंख्यांक बहुक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत (MsDP) पुरेसे प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे तसेच १२ व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत मान्यताप्राप्त विकासकामांच्या दुस-या हप्त्याची मागणी प्राप्त न झाल्याने या योजनेखाली पूर्ण निधी वितरित करण्यात आला नाही.

(३) हे खरे नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शेतीचे शिक्षण देण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(१९) १०९७०६ (०१-०४-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शेतीचे शिक्षण देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, निर्णयाअंती ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शेतीचे शिक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०४-२०१८) :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शालेय विध्यार्थ्यांच्या अवांतर वाचनासाठी सुरु केलेल्या एकभाषिक पुस्तक खरेदी योजनाच्या टेंडर प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(२०) ११००४१ (०६-०४-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने शालेय विध्यार्थ्यांच्या अवांतर वाचनासाठी सुरु केलेल्या कोट्यावधी रुपयाच्या एकभाषिक पुस्तक खरेदी योजनाच्या टेंडर प्रक्रियेत अनियमितता झाल्याबद्दल मराठी प्रकाशकाने शिक्षण विभाग कडे तक्रार केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर प्रकरणाची लाचलुचपत प्रतीबंधक विभागाकडून चौकशी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शालेय विध्यार्थ्यांच्या अवांतर वाचनासाठी सुरु केलेल्या कोट्यावधी रुपयाच्या एकभाषिक पुस्तक योजनाच्या टेंडर प्रक्रियेत अनियमितता झाल्याने ती रद्द करून नवीन पारदर्शक प्रक्रिया राबवण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार सदर टेंडर प्रक्रिया चौकशी अवाहालातील दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०५-२०१८) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) निविदा प्रक्रीयेमध्ये अनियमितता झाली नसल्याने, प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागत असल्याबाबत

**(२१) १११३२१ (०५-०४-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत देण्यात येणारी शिष्यवृत्ती रक्कम विद्यार्थ्यापर्यंत पोहोचत नसल्यामुळे शिष्यवृत्ती प्रक्रिया ऑनलाईन करण्यात यावी अशी मागणी विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे अनेकदा लेखी निवेदनाद्वारे तसेच जाहिररित्या केली असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शिष्यवृत्ती प्रक्रिया ऑनलाईन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) नाही.

(२) प्रश्न उदभवत नाही. तथापि, राज्यशासनाकडून उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना राबवली जाते. सदर योजनेच्या भाग १ अंतर्गत उच्च व्यावसायिक, तांत्रिक व वैद्यकिय शिक्षणासाठी रुपये २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) किंवा प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येत असून या संबंधिची अर्ज करण्यापासून ते शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्याची सर्व कार्यवाही ऑनलाईन करण्यात येते. योजनेच्या भाग २ अंतर्गत इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या (उदा. कला, वाणिज्य आणि विज्ञान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम) राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्ती योजने अंतर्गत रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये पांच हजार) किंवा प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते. शिष्यवृत्तीची संख्या २,००० असून नूतनीकरण अर्जासाठी मर्यादा नाही. सदर भाग २ शिष्यवृत्ती योजना ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात येत असून ती ऑनलाईन करण्याची बाब विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अल्प संख्याक बहुक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मोताळा (जि.बुलडाणा) तालुक्याचा समावेश करण्याबाबतचा

**(२२) १११५८० (०५-०४-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हा हा अल्प संख्याक बहुक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत समाविष्ट आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील मोताळा तालुक्याचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव अद्यापही प्रलंबीत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मोताळा तालुक्यातील अल्प संख्याक समुदाय विविध योजनांपासून वंचित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) बहुक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत संपूर्ण बुलडाणा जिल्ह्याचा समावेश नसून बुलडाणा जिल्ह्यातील बुलडाणा, खामगांव, शेगांव व चिखली या चार गटांचा समावेश बहुक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनामार्फत करण्यात आला आहे.

(२) हे, खरे आहे.

(३) हे खरे नाही.

बहुक्षेत्र विकास कार्यक्रम या केंद्र पुरस्कत योजनेंतर्गत गाव समुह निश्चितीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी दिनांक २७/०५/२०१६ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदर अहवालामध्ये मोताळा पंचायत समितीचा समावेश आहे. सदर अहवालास दिनांक ११/०५/२०१७ रोजी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समितीची मान्यता घेऊन सदर अहवाल दिनांक १०/०७/२०१७ रोजी केंद्रशासनास पाठविण्यात आला आहे. तसेच दिनांक २९/०३/२०१८ च्या पत्रान्वयेसुद्धा मोताळा तालुक्याचा समावेश बहुक्षेत्रिय विकास कार्यक्रमांतर्गत करण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

बहुक्षेत्र विकास कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत योजनेत सद्यस्थितीत बुलडाणा जिल्ह्यातील मोताळा तालुक्याचा समावेश केंद्रशासनाने केलेला नाही. राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मोताळा तालुक्यातील अल्पसंख्यांक समुदायाला देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर, मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील जिल्हा परिषद व नगरपालिका शाळेतील सर्व शिक्षा अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गणवेश अनुदानाचे वितरणाबबत**

**(२३) १११६२४ (०६-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर, मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील जिल्हा परिषद व नगरपालिका शाळेतील सुमारे २००० विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियान अंतर्गत देण्यात येणाऱ्या मोफत गणवेश अनुदानाचे वितरण करण्यात आले नसल्यामुळे विद्यार्थी सदरील योजनेपासून वंचित राहीले असल्याचे दिनांक २६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, उपरोक्त प्रकरणी जिल्हा प्रशासनानी विद्यार्थ्यांची बँक खाती व आधारकार्ड काढणेसाठी बऱ्याच अडचणींना सामना करावा लागत असल्याने शासनाने यामध्ये दुरूस्ती करण्याची आवश्यकता असल्याचेही सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय अाढळून आले व त्यानुसार विद्यार्थ्यांना गणवेशाचे वितरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-०४-२०१८) :** (१) मोफत गणवेश योजनेंतर्गत पंढरपूर तालुक्यातील एकूण १५,७४१ पात्र विद्यार्थी विद्यार्थ्यांपैकी १४,४२५ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात लाभाची रक्कम जमा करण्यात आली आहे. तसेच, मंगळवेढा तालुक्यातील एकूण १०,२९१ पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांपैकी ९,१४१ विद्यार्थ्यांची बँक खाती उघडण्यात आली असून त्यापैकी ९०७३ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात लाभाची रक्कम जमा करण्यात आली आहे.
(२) व (३) शासनाच्या दि. ०५/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांना देण्यात येणारा लाभ लाभार्थ्यांच्या थेट बॅक खात्यामध्ये जमा करण्यासाठी मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनानुसार लाभार्थी विद्यार्थ्यांचे त्यांच्या आईच्या नावासह आधार संलग्न संयुक्त बँक खाते राष्ट्रीयकृत बँक शेडयुल बँक, ग्रामीण बँकमध्ये उघडण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, याबाबत काही अडचणी उद्भवल्याने स्वत: लाभार्थी विद्यार्थी व आई यांच्या आधार संलग्न संयुक्त बँक खात्याचा आग्रह न धरता विद्यार्थी किंवा आई किंवा वडील आणि आई-वडील नसल्यास लाभार्थ्यांचे अन्य पालकांच्या वैयक्तिक आधार संलग्न खात्यावर गणवेश लाभाची रक्कम वर्ग करण्याबाबत सर्व क्षेत्रिय यंत्रणांना कळविण्यात आले आहे. सद्यस्थितीत बँक खाती नसलेल्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यास्तव त्यांना चालू वर्षापुरती DBT योजनेमधून सूट दिली आहे. विद्यार्थ्यांची बँक खाती शुन्य रक्कमेवर (Zero Balance) वर उघडण्याबाबत आणि सदर खात्यावर कोणतेही शुल्क न आकारण्याबाबत बँकाना निर्देश देण्यात यावेत आणि सर्व विद्यार्थ्यांची बँक खाती काढण्यास कालावधी मिळण्यासाठी चालू व पुढील शैक्षणिक वर्षासाठी मोफत गणवेश योजनेस एका वर्षासाठी सूट देण्यात यावी, अशी विनंती नियोजन आणि वित्त विभागास करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतक-यांना दिले जाणारे धान्य वितरण बंद करण्याबाबत**

**(२४) १११६७६ (२०-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना दिले जाणारे धान्य वितरण बंद करण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे दिनांक २३ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील मराठवाडा विभागात यंदा दुष्काळ नसला तरी कृषी समस्येने शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार येथील शेतक-यांना दिले जाणारे धान्य वितरण बंद न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१८-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील १४ जिल्ह्यांमधील एपीएल (केशरी) शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या खर्चाने सवलतीच्या दराने अन्नधान्य देण्यात येत असून माहे जून, २०१८ पर्यंतच्या अन्नधान्याचे जिल्हानिहाय नियतन देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

औरंगाबाद विभागात सन २०१५ मध्ये एकूण ११३३, सन २०१६ मध्ये १०५३, सन २०१७ मध्ये ९९१ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे निदर्शनास आली आहेत. त्यापैकी सन २०१५ मध्ये ८२५, सन २०१६ मध्ये ७५७, सन २०१७ मध्ये ७१० आत्महत्यांची प्रकरणे जिल्हाधिकारी यांच्याकडून पात्र ठरविण्यात आली आहेत. औरंगाबाद विभागात सन २०१७ मधील ८४ प्रकरणे चौकशीकरीता प्रलंबित असून उपरोक्त आकडेवारीनुसार आत्महत्येचे एकूण प्रमाण कमी झाल्याचे आढळून येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील वृद्ध कलाकारांच्या मानधनाबाबत**

**(२५) १११९३० (०५-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील वृद्ध कलाकार मागील अठरा महिने मानधनापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्य शासनाने पुणे शहर आणि जिल्ह्यातील वृध्द कलावंतांची सन २०१६-१७ या कालावधीमधील १८० प्रकरणे ऑगस्ट, २०१७ मध्ये मंजूर करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने ऑनलाईन कलाकार मानधन योजना अंमलात आणली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ही ऑनलाईन कलाकार मानधन योजना पूर्णक्षमतेने कार्यरत नसल्याने वृध्द कलाकारांना मानधनापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील वृद्ध कलाकारांना मानधन मिळणेबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्हयात एकूण १४११ कलावंत असून त्यापैकी एकूण १००४ कलावंत यांना ऑनलाईन पध्दतीने मानधन त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. उर्वरित ४०७ कलावंत मयत असून त्यांच्या वारसदार पती/पत्नी यांनाही मानधन मंजूर करण्याची कार्यवाही जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे स्तरावर सुरु आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ या तीन वर्षातील १८० कलावंतांची यादी प्राप्त झाली असून त्यानुसार या कलावंतांच्या बँक खात्यात माहे फेब्रुवारी, २०१८ पर्यंतचे मानधन ऑनलाईन पध्दतीने जमा करण्यात आले आहे.

(३) हे खरे आहे.

राज्याच्या सर्व जिल्हयातील कलावंतांचे मानधन दिनांक १ सप्टेंबर, २०१६ पासून ऑनलाईन पध्दतीने त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरळी कोळीवाडा (मुंबई) येथील ऐतिहासिक किल्ल्याच्या जतन-दुरुस्तीच्या व सुशोभिकरणाच्या कामाच्या सद्यस्थितीबाबत

**(२६) ११२२३९ (०५-०४-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी कोळीवाडा (मुंबई) येथील ऐतिहासिक किल्ल्याच्या जतन-दुरुस्तीच्या व सुशोभिकरणाचे सर्वागीण अंदाजपत्रक बनविण्याचे काम शासनाने हाती घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू किल्ल्याच्या जतन-दुरुस्तीसाठी व सुशोभीकरणासाठी बनविण्यात आलेल्या अंदाजपत्रकान्वये किती रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे,
(३) असल्यास, सदरहू निधी तातडीने उपलब्ध करून देवून वरळी किल्ल्याच्या जतन-दुरुस्तीचे आणि सुशोभीकरणाचे काम सुरु करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०४-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) मुंबई फोर्ट सर्किट योजनेअंतर्गत सन २००७-०८ मध्ये सदर किल्ल्याच्या जतन दुरुस्तीकरीता रु. ८२.४१ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला आहे. आता सदर किल्ल्याच्या आवश्यक किरकोळ दुरुस्तीकरीता रु.८६.८७ लक्ष इतक्या रक्कमेचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही संचालनालयाच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील शाळांमधील पूर्व प्राथमिक वर्गाची प्रवेश प्रक्रियेबाबत

**(२७) ११२२४५ (०६-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील बहुतेक शाळांमध्ये पूर्व प्राथमिक वर्गाची प्रवेश प्रक्रिया सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत काही वर्षापासून बहुतेक शाळांनी माहितीपत्रके, अर्ज यांची विक्री बंद करून ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रक्रिया चालू असतानाही प्रवेशप्रक्रिया शुल्काच्या नावाखाली पालकांकडून अवाजवी शुल्क घेत असल्याचे निदर्शनास आले आहे आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीनुसार संबंधित शाळांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) पूर्व प्राथमिक शिक्षणाविषयीचे धोरण शासनाच्या विचाराधीन आहे.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील पात्र लाभार्थी “मोफत गॅस सिलेंडर जोडणी” योजनेपासून वंचीत असल्याबाबत

**(२८) ११२६७९ (२०-०४-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) करिता पूर्व व पश्चिम अशी दोन शिधावाटप कार्यालये असून दोन्ही कार्यालय मिळून शिधावाटप पत्रिका धारकांची संख्या एक लाख एकत्तीस हजार असून त्यापैकी ५० हजार कार्ड धारकांकडे "मोफत गॅसजोडणी योजना" अंतर्गत गॅसजोडणी नसल्यामुळे सदर कुटुंबे रॉकेल, लाकूड, गोवऱ्या इत्यादीचा वापर करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन गरीब कुटुंबासाठी राबवीत असलेल्या "मोफत गॅसजोडणी योजनेची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शना आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच गॅसजोडणी नसल्याने स्वयंपाकासाठी वापरत असलेल्या इतर साधनांनी प्रदूषण निर्माण होऊन श्वसना सारखे रोगाचे प्रमाण वाढलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त गॅस जोडणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०९-०५-२०१८) :** (१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील दोन्ही कार्यालयाअंतर्गत एकूण १,५६,४४६ शिधापत्रिका असून त्यापैकी ८०,२७३ शिधापत्रिका बिगर गॅसधारक आहेत. बिगर गॅसधारक शिधापत्रिकांवर केरोसिन वितरीत करण्यात येते.तथापि, लाकुड, गोवऱ्या इत्यादीचा वापर होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) हे खरे नाही.
(३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात जिल्हानिहाय अल्पसंख्याक मुलींसाठी वसतिगृह सुरु करण्याबाबत

**(२९) ११२९७७ (०५-०४-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जिल्हानिहाय अल्पसंख्याक मुलींसाठी वसतिगृह सुरु करण्याच्या योजनांची अंमलबजावणी झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१४ पासून वसतिगृहामध्ये किती अल्पसंख्यांक मुलीना प्रवेश देण्यात आला आहे,
(३) असल्यास, अल्पसंख्याकाच्या राखीव जागेपैकी कमी मुलींना प्रवेश दिला असल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०५-२०१८) :** (१) होय.

(२) सन २०१४ पासून टप्याटप्याने बांधकाम पूर्ण झालेल्या १९ पैकी १७ वसतिगृहामध्ये सन २०१४-१५ मध्ये ५९, सन २०१५-१६ मध्ये १७०, सन २०१६-१७ मध्ये ३५४ व सन २०१७-१८ मध्ये ४७२ उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थीनींना प्रवेश देण्यात आला आहे.

(३) जेवढ्या अल्पसंख्याक विद्यार्थीनींनी वसतिगृह प्रवेशाकरिता अर्ज केले आहेत, तेवढ्या सर्व विद्यार्थीनींना प्रवेश देण्यात आला आहे. तथापि, अर्ज करणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थीनींचे प्रमाण कमी असल्याने कमी विद्यार्थीनींना प्रवेश दिला आहे.

(४) (अ) अल्पसंख्याक विद्यार्थीनींच्या पालकांमध्ये मुलींना बाहेरगावी वसतिगृहात ठेवण्याबाबत जागरूकता नसल्यामुळे कमी प्रतिसाद प्राप्त झाला आहे.

(ब) काही वसतिगृहामध्ये प्रथम वर्ष असल्याने वसतिगृहाबाबत अपुरी माहिती पोहचल्याने कमी अर्ज प्राप्त झाले.

(क) प्रवास खर्च हा निवासी आहारावरील खर्चापेक्षा कमी असल्याने पालक मुलींना बाहेरगावी वास्तव्य करून शिक्षण घेण्याकरिता पाठविण्यास तयार नाहीत.

या योजनेंतर्गत सन २०१४ पासून वसतिगृहातील अल्पसंख्याक विद्यार्थीनींचे प्रवेश पाहिल्यास दरवर्षी विद्यार्थीनींची प्रवेश संख्या वाढत आहे. याबाबत अल्पसंख्याक विद्यार्थीनींच्या पालकांमध्ये जागरूकता येणे आवश्यक आहे. सदर योजनेला विविध प्रसार माध्यमांव्दारे प्रसिध्दी देण्यात येत आहे. तसेच कार्यशाळा घेऊन सदर योजनेबाबत माहिती दिली जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## स्वस्त धान्य दुकानदारांना विलंबाने होत असलेल्या पुरवठयाबाबत

**(३०) ११३११४ (१४-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१स्वस्त धान्य दुकानदारांना त्यांच्या गावी दुकानापर्यंत धान्य देण्यात यावे असा शासकीय निर्णय करण्यात आला परंतु गावात लवकर धान्य येत नसल्याने रेशन कार्डधारकांची गैरसोय होत आहे हे खरे आहे काय, त्यामुळे गरीबांना आर्थिक भूर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित टेंडर ज्या गुत्तेदारांकडे दिले आहे त्या गुत्तेदारांवर शासनाने काय कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येणार आहे,

(३) तसेच, धान्याची उपलब्धता रेशन दुकानांवर महिन्याच्या पहिल्या आठवडयात करण्यासंदर्भात शासनाने काय उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येणार आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१७-०५-२०१८) :** (१) सुधारीत धान्य वितरण पद्धतीअंतर्गत नवीन वाहतूक व्यवस्थेद्वारे द्वार पोच योजना राज्यामध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. यामध्ये रेशनकार्ड धारकाची गैरसोय होत आहे किंवा गरिबांना आर्थिक भूर्दंड सोसावा लागत आहे, अशी परिस्थिती नाही.
(२) कोणत्याही जिल्हयातील वाहतूकदाराकडून द्वार पोच योजनेची अंमलबजावणी योग्य रितीने होत नसल्याची बाब निदर्शनास आल्यास त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याची तरतूद शासन निर्णयात ठेवण्यात आली असून त्यानुसार कारवाई करण्यात येईल.
(३) धान्याची उपलब्धता शिधा वाटप दुकानांवर नियतनाच्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात व्हावी यासाठी भारतीय खाद्य निगमकडून धान्याची उचल किमान ६० दिवस आधी करण्यासाठी, शिधा वाटप दुकानांपर्यंत धान्य विहीत वेळेत पोहोचवावे यासाठी, दुसऱ्या टप्प्याच्या वाहतुकीचे झोन निश्चित करुन त्यानुसार वाहतूक करण्याच्या सूचना क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयातील अतिदुर्गम व डोंगराळ भागात वसलेल्या धनगरवाड्यांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याबाबत

**(३१) ११३३६८ (१४-०४-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील अतिदुर्गम व डोंगराळ भागात वसलेल्या धनगरवाड्यांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टंचाईग्रस्त धनगरवाड्यांचा सर्व्हे करून अहवाल सादर करण्याचे शासनाचे वतीने सूचित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, तद्नुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली व पाणी समस्येवर उपाययोजना करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) याबाबत जिल्हापरिषद स्तरावरुन पाहणी करण्यात आली असून ज्या धनगर वाडयांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही त्या ठिकाणी नळयोजना दुरुस्ती, पाऊस पाणी संकलन टाकी, जलयुक्त शिवार योजना विहिरी, विंधन विहिरी, नविन नळपाणी पुरवठा योजना, उद्भव बळकटीकरण इत्यादी उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिपळूण नगरपरिषद (जि.रत्नागिरी) हद्दीत असलेली शिवकालीन घोडेबाव (घोडे विहीर) जतन करण्याबाबत

**(३२) ११३३८५ (०६-०४-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण नगरपरिषद (जि.रत्नागिरी) हद्दीत असलेली शिवकालीन घोडेबाव ही एक ऐतिहासिक विहिर असून याचे जतन करण्याकडे दुर्लक्ष होत असल्याने त्याचे अस्तित्व संपुष्टात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या सैन्याची आठवण असलेली ही ऐतिहासिक ठेवा असलेली घोडबावचे संवर्धन करून सुशोभिकरण करुन घोडेबाव राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, तसेच सदर विहिरीची प्रत्यक्ष पाहणी करुन त्याबाबतचा अहवाल केव्हापर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (१६-०४-२०१८) :** (१) चिपळूण नगरपरिषद (जि.रत्नागिरी) हद्दीत असलेली सदरची शिवकालीन घोडबाव (घोडे विहीर) ही राज्य संरक्षित स्मारक नाही.

(२) सहायक संचालक, रत्नागिरी यांचेकडून सदर घोडेबावची पाहणी केली असता, सदर बारवेची कोणतेही लक्षणीय वस्तू विशेष नाही. सदर घोडेबाव राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याच्या आवश्यक निकषांमध्ये तांत्रिकदृष्टया बसत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर (दापोली) (जि.रायगड) येथील शिक्षण विस्तार अधिकाऱ्याला निलंबित केल्याबाबत

**(३३) ११३६११ (०६-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर (दापोली) (जि.रायगड) येथील श्री.नंदलाल कचरुशिंदे, शिक्षण विस्तार अधिकारी, पालघर (दापोली) यांनी शालेय पोषण आहार योजनेची योग्य पध्दतीने अंमलबजावणी होते किंवा नाही याचा लेखाजोखा ठेवला नसल्याचा ठपका ठेवून त्यांना निलंबित करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान जिल्हा परिषदेने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून योजनेची अंमलबजावणी व्यवस्थितपणे न करणे, वित्तीय अनियमितता करणे इत्यादी बाबींमध्ये दोषी आढळल्याने श्री.शिंदे, विस्तार अधिकारी (शिक्षण) यांना निलंबित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील अल्पसंख्यांकासाठी निधी देण्याबाबत**

**(३४) ११३७५९ (०५-०४-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांकाच्या विकासासाठी शासनाने रुपये ३०० कोटी निधी मंजूर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयात सुमारे ४ लाखापेक्षा जास्त अल्पसंख्यांकांची संख्या असतानांही रायगड जिल्हयातील लोकांसाठी निधी देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार रायगड जिल्हयातील अल्पसंख्यांकांसाठी निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात अल्पसंख्यांक विकास विभागासाठी रु.४०७.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला होता.

(२) हे खरे नाही.

रायगड जिल्ह्यामध्ये अल्पसंख्यांकांच्या विकासासाठी असलेल्या विविध योजनांतर्गत एकूण रु.५९.३० लाख इतका निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाले (ता.उरण, जि.रायगड) येथे केरोसिन व धान्य वाटपात काळा बाजार होत असल्याबाबत**

**(३५) ११३८३७ (१५-०४-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाले (ता.उरण, जि.रायगड) गावातील रेशनिंग कार्ड धारकांना पुरवठा करण्यात येणा-या केरोसिन व धान्य वाटपात विक्रेते बाळाराम बुध्या म्हात्रे व प्रभाकर बाबुराव म्हात्रे हे मोठया प्रमाणात काळा बाजार करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित पुरवठा अधिकारी हे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत असल्यामुळे उक्त विक्रेते मोठ्या प्रमाणात केरोसिन व अन्नधान्याचा काळा बाजार करित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुरवठा अधिकारी यांची चौकशी करण्याची मागणी पाले गावातील ग्रामस्थांनी तहसिलदार, उरण यांच्याकडे लेखी स्वरूपात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०९-०५-२०१८) :** (१), (२), (३) व (४) श्री.सुरेश बाबुराव म्हात्रे, रा.पाले, ता.उरण यांनी दि.२.१.२०१८ रोजी तहसिल कार्यालय, उरण येथे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.२०.२.२०१८ रोजी श्री.बाळाराम बुध्या म्हात्रे व श्री.प्रभाकर बाबुराव म्हात्रे, किरकोळ केरोसिन परवानाधारक यांची तपासणी केली असता एकूण २९८ लिटर केरोसिन साठा शिल्लक असल्याचे आढळून आले तसेच गॅसधारकांनाही केरोसिन वाटप करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले.त्यामुळे दि.१७.३.२०१८ रोजी दोन्ही केरोसिन परवाने रद्द करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातील शालेय पोषण आहार योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(३६) ११३९१५ (०६-०४-२०१८). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील शालेय पोषण आहार योजनेतील गैरव्यवहार प्रकरणी पोलीस आणि जिल्हा परिषद प्रशासनाकडे तक्रार करुनही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत तीन वर्षापासून या प्रकरणाकडे दुर्लक्ष करण्यात आलेले असून अन्न व औषध प्रशासन विभागाने तीन वर्षानंतर या प्रकरणाचा अहवाल जिल्हापरिषदेला दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच अत्यल्प प्रमाणात पाऊस पडून देखील शासनाने सदरील तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहिर केलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शालेय पोषण आहार योजनेतील गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे. तथापि, धान्यादी मालाच्या मुदतबाह्य साठयाबाबत कारवाई करण्याचे अधिकार अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व नियम २०११ अनुसार अन्न व औषध प्रशासन विभागास असल्याने सदर विभागाने याबाबतची सर्व कायदेशीर कार्यवाही केली आहे.

(२) हे खरे आहे.
(३) केंद्र शासनाच्या दुष्काळ संहिता २०१६ मधील निकषामध्ये जळगाव जिल्हयातील एकही तालुका बसत नसल्यामुळे जळगाव जिल्हयात दुष्काळ जाहीर करण्यात आलेला नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील जिवती गट ग्रामपंचायत असलेल्या येरमी-येसापूर तसेच कवठी (ता.सावली)या गावांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(३७) ११४०३२ (१९-०४-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील जिवती गट ग्रामपंचायत असलेल्या येरमी-येसापूर या दोन गावांमध्ये असलेल्या जलस्वराज्य योजनेतून बांधण्यात आलेल्या टाकीत पाणी पोहचत नसून कवठी (ता.सावली) या गावात घरगुती नळ आणि सार्वजनिक बोअरवेल बंद असल्याने पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त गावातील पाणी टंचाई दूर करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (३०-०५-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) जिवती गट ग्रामपंचायत असलेल्या येरमी-येसापूर या दोन गावांमध्ये जलस्वराज्य टप्पा-१ अंतर्गत कार्यान्वित केलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेच्या विद्युत पुरवठ्यामध्ये दिनांक १६ व १७ एप्रिल, २०१८ ला तांत्रिक बिघाड झाल्यामुळे पाणी पुरवठा बंद झाला होता. सदर बिघाड ग्रामपंचायतीकडून दूर करण्यात येवून दिनांक १८ एप्रिल, २०१८ पासून सदर योजनेतून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. योजना बंद कालावधीत सदर गावांत ०३ हातपंपाद्वारे पाण्याची गरज भागविण्यात आली.

मौजा कवठी (ता.सावली) हे गाव टेकाडी ता. मुल या १९ गावे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेमध्ये समाविष्ट आहे. माहे जानेवारी २०१८ मध्ये सदर प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेच्या दोन्ही पंपामध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे दिनांक ०२ जानेवारी ते १४ जानेवारी, २०१८ या कालावधीमध्ये पाणी पुरवठा बंद झाला होता. या दोन्ही पंपातील तांत्रिक बिघाड दूर करण्यात येवून दिनांक १५ जानेवारी, २०१८ पासून पाणी पुरवठा सुरळीत सुरु करण्यात आला. योजना बंद कालावधीत मौजा कवठी या गावात उपलब्ध असलेल्या १० हातपंप व ८ साध्या विहिरीद्वारे पाण्याची गरज भागविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अल्पसंख्यांकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३८) ११४०७७ (०५-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांकांची संख्या मोठया प्रमाणात असून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांच्या विकासासाठी किमान दोन हजार कोटी निधीची आवश्यकता असताना केवळ रुपये ३५० कोटी इतका अल्प निधी दिला असल्याने त्यांच्यात तीव्र असंतोष पसरला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी निधीची वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) अल्पसंख्यांक विकासासाठी उपलब्ध करुन देण्यात येणा-या निधीसंदर्भात सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात चर्चा झाली तसेच याबाबत मा.मंत्री (वित्त) यांचे अध्यक्षतेखाली अल्पसंख्यांक समाजातील लोकप्रतिनिधींसमवेत बैठक झाली. त्यावेळी अल्पसंख्यांक विकासासाठी उपलब्ध करुन देण्यात येणारा निधी कमी करण्यात आलेला नाही तसेच त्यामध्ये दरवर्षी वाढ होत असल्याची बाब लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास आणण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सेलू (जि.परभणी) तालुक्यामध्ये पाण्याचे स्त्रोत अधिग्रहणाची रक्कम देण्याबाबत

**(३९) ११४११७ (१४-०४-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.परभणी) तालुक्यामध्ये गतवर्षीच्या उन्हाळ्याकरिता पाणी टंचाई निर्माण झाल्याने पाण्याचे स्त्रोत अधिग्रहीत केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी १४ गावातील २१ शेतकऱ्यांना अद्यापही मोबदला देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबधित शेतकऱ्यांना मोबदल्याची रक्कम दिली जाणार आहे काय, ती किती कालावधीपर्यत दिली जाणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) तहसिलदार यांनी मंजूरी दिलेल्या २५ विहीर/बोअर अधिग्रहण प्रस्तावांपैकी ८ विहीर/बोअर मालकांना अधिग्रहणाची रक्कम अदा करण्यात आलेली आहे. उर्वरित १७ विहीर/बोअर मालकांना बँकेच्या पासबुकची छायांकित प्रत तसेच गावकऱ्यांना पाणी वाटप केल्याबाबतचे सरपंच व ग्रामसेवक यांच्या प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध करुन दिल्यानंतर अधिग्रहणाची रक्कम अदा करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील प्राथमिक विभागाचे गटशिक्षणाधिकारी पद रिक्त असल्याबाबत**

**(४०) ११४१७३ (०६-०४-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील प्राथमिक विभागाचे गटशिक्षणाधिकारी हे पद मागील ६ महिन्यांपासून रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे प्रभारी गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे दोन तालुक्यांचा कार्यभार असल्याने ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा वाढविण्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानूसार सदरहू गटशिक्षणाधिकारी हे पद तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) गटशिक्षणाधिकारी हे उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील पद आहे. उपशिक्षणाधिकारी पदाच्या दिनांक ५.०७.२०१६ च्या सेवाप्रवेश नियमानुसार ३ मार्गाने पदभरती करण्यात येते. उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील मंजूर ६१५ पदांपैकी ३३२ पदे भरलेली असून २८३ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. तथापि, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २९.१२.२०१७ च्या पत्रानुसार पदोन्नती कोट्यातील केवळ खुल्या प्रवर्गाच्या पदावर तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्याबाबत निदेश असल्याने पदोन्नतीवर निर्बंध आले आहेत. तसेच सरळसेवा कोट्यातील पदे भरण्यासही वित्त विभागाचे निर्बंध आहेत. त्यामुळे गट-ब संवर्गातील पदे रिक्त आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देऊळगावराजा (जि.बुलढाणा) येथील महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत पाणीपुरवठा योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(४१) ११४३०५ (१४-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगावराजा (जि.बुलढाणा) येथील महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत पाणीपुरवठा योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांना दिनांक १३ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाकडून किती निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०५-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) देऊळगांव राजा शहर पाणी पुरवठा योजनेच्या उपांगाच्या वाढीव खर्चाबाबत योजनेचे सुधारित अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेसह प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश पत्रान्वये तसेच दि.१५.३.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांना देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शाळाबाहय मुले शोधून ती प्रत्यक्षात शाळेत आणण्याबाबत

**(४२) ११४३२० (०६-०४-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळाबाहय मुले शोधून ती प्रत्यक्षात शाळेत आणण्यासाठी त्यांच्या पालकांचे संपर्क क्रमांक मिळवा व त्यांच्या संपर्कात रहा आणि या मुलांना शाळेत आणा असा शासनाने शिक्षकांना आदेश दिला असल्याचे दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचबरोबर शाळाबाहय मुले शोधण्यासाठी परिसरात फिरण्याची सवय ठेवा, असाही या आदेशात उल्लेख करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आदेशाला शिक्षक व शिक्षक संघटनांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर आदेश द्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात प्राधान्य कुटूंब लाभार्थ्यांसाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजने अंतर्गत लाभ देण्यात आलेला नसल्याबाबत**

**(४३) ११४४४१ (२०-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्राधान्य कुटूंब लाभार्थ्यांसाठी ग्रामीण भागासाठी ४४०००/- व शहरी भागासाठी ५९०००/- वार्षिक उत्पनाची मर्यादा असलेल्या लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजने अंतर्गत शासन निर्णयानुसार अद्याप अन्नधान्याचा लाभ देण्यात आलेला नसल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१८-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत शहरी भागातील रु.५९,०००/- व ग्रामीण भागातील रु.४४,०००/- कमाल वार्षिक उत्पन्न असलेल्या लाभार्थ्यांचा इष्टांकाच्या मर्यादेत पात्र लाभार्थी म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. राज्यामध्ये सध्या शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम सुरु असून, सदर काम बहुतांश पूर्ण झालेले आहे. शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्याबाबतचा निर्णय दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.
(२) शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर अपात्र शिधापत्रिकाधारकांची लाभार्थी म्हणून नोंद होणार नसल्याने ते आपोआप रद्द होतील आणि त्यामुळे प्राप्त झालेल्या इष्टांकानुसार नवीन पात्र लाभार्थ्यांचा योजनेत समावेश करण्यात येईल
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंढवा (पुणे) येथे शासकीय धान्य असलेला ट्रक ताब्यात घेतला असल्याबाबत

**(४४) ११४६०९ (२०-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंढवा (पुणे) पोलिसांनी बी.टी.कवडे रस्त्यावरून शिधावाटपाकरिता असलेले शासकीय धान्य असल्याच्या संशयावरून एम.एच.०६,के.८५५९ हा ट्रक दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास ताब्यात घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ट्रकमध्ये लोणी काळभोर इंडस्ट्रीमधील एक पोल्ट्री कंपनीच्या नावाचा शिक्का असलेली ५० किलो वजनाच्या गव्हाची नायलॉनची पोती असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय धान्य काळाबाजार प्रकरणात पुरवठा खात्याचे अधिकारी गुन्हा दाखल करतात, मात्र या प्रकरणात पुरवठा निरीक्षकांनी या प्रकरणाशी आमचा काहीही संबंध नाही असे सांगितल्याने पुढील कारवाई करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार धान्याचा काळाबाजारप्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१७-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. दि. १६ नोव्हेंबर, २०१७ रोजी पुरवठा निरिक्षक ड विभाग यांनी पोलीसांच्या पथकासह चौकशी व स्थळपहाणी करुन धान्याचा काळाबाजार प्रकरणी ट्रकचालक श्री.नितीन अजिनाथ सोनवणे यांचेविरुध्द दि. १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी मुंढवा पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा नं. ३१०/२०१७ दाखल केलेला आहे.

(४) या अनुषंगाने स्वस्त धान्य दुकान परवानाधारक श्रीमती लक्ष्मीबाई श्याम सोनवणे अध्यक्ष रमाबाई आंबेडकर महिला बचत गट, स्वस्त धान्य दुकान यांचा परवाना क्रं.ब/६९ ची तपासणी करण्यात येऊन तपासणी दोषांचे अनुषंगाने पुरवठा कार्यालयाच्या आदेश क्र. अविअ / फिप / स्वधादु/सीआर १०६/१७, दि. २९ नोव्हेंबर, २०१७ नुसार परवाना कायमस्वरुपी रद्द करण्यात आलेला आहे. दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने पोलीस तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वक्फ बोर्डाच्या मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याच्या शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत

**(४५) ११४६५२ (०५-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वक्फ बोर्डाच्या मालमत्तांच्या सन १९९७ ते २००२ या कालावधीत झालेल्या सर्वेक्षणात दिनांक १ जानेवारी, १९९६ पर्यंतच्या मालत्तांचे सवर्हेक्षण झाल्यामुळे शासनाने दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून ३१ डिसेंबर, २०१६ पर्यंत अस्तित्वात आलेल्या आणि पहिल्या सर्वेक्षणात समाविष्ट न झालेल्या वक्फ बोर्डाच्या मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे व परभणी येथील वक्फ बोर्डाच्या मालमत्तांचे सर्वेक्षण प्रायोगिक तत्वावर पूर्ण करण्यासाठी विभागीय आयुक्तांची एक सदसीय समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील मशिदी, दर्गे, कब्रस्थान, अनाथालय आदी संस्थांची स्तावर मालमत्ता व मशरुतूल खिदमत इमाम या मालमत्तांचे सर्वक्षण करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परभणी व पुणे जिल्ह्यांव्यतीरिक्त अन्य जिल्ह्यातील वक्फ बोर्डाच्या मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यासाठी किती कालावधी लागेल व सर्वेक्षण कामांसाठी किती लाख रुपये अंदाजित खर्च येणार आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) सर्वेक्षणाच्या पहिल्या टप्प्यात पुणे आणि परभणी येथे पथदर्शी सर्व्हेक्षण करण्यास सुरुवात करण्यात आलेली असून सदर सर्व्हेक्षणाच्या आधारे संपूर्ण राज्यातील वक्फ मालमत्तांचे सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. सदर सर्वेक्षण दोन वर्षात पूर्ण होणे अपेक्षित आहे. पुणे व परभणी येथील पथदर्शी सर्वेक्षणासाठी रु.१.०८ कोटी तसेच राज्याच्या उर्वरित भागातील सर्वेक्षणासाठी रु.४.२७ कोटी खर्च अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शालेय विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात गणवेश आणि शालेय साहित्यासाठी जमा करण्यात आलेल्या रकमेत राष्ट्रीयीकृत बँकांनी अवाजवी कपात केल्याबाबत

**(४६) ११४७१२ (०६-०४-२०१८). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यार्थ्यांना गणवेश आणि शालेय साहित्य न देता त्याचे पैसे थेट त्यांच्या खात्यात जमा करण्यास सुरुवात झाली परंतु आपल्याच खात्यातील पैशात बँकेने वस्तू आणि सेवाकर अशी विविध कारणे सांगून अवाजवी कपात केल्याने खात्यात अवघे पन्नास-साठ रुपये शिल्लक राहिले असल्याची बाब दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या खात्यात पन्नास-साठ रुपये शिल्लक असल्याने पहिले सत्र गेले तरीही बहुतेक विद्यार्थ्यांना गणवेश किंवा त्याची रक्कम मिळालेली नसून शालेय साहित्य आणि गणवेशासाठी स्वत:कडील पैसे खर्च करावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच बँक खात्यामधील किमान रकमेची अट विद्यार्थांनी न पाळल्याने त्यांच्या खात्यामधून बँकांनी लाखो रुपयांचा दंड वसूल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शालेय विद्यार्थ्यांना किमान रक्कम अटीतून वगळावे आणि त्यांच्यावरील दंडात्मक कारवाई मागे घेण्यात यावी यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-०४-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) विद्यार्थ्यांची बँक खाती शुन्य रक्कमेवर (Zero Balance) वर उघडण्याबाबत आणि सदर खात्यावर कोणतेही शुल्क न आकारण्याबाबत बँकांना निर्देश देण्यात यावेत आणि सर्व विद्यार्थ्यांची बँक खाती काढण्यास कालावधी मिळण्यासाठी चालू व पुढील शैक्षणिक वर्षासाठी मोफत गणवेश योजनेस DBT मधून सूट देण्यात यावी, अशी विनंती नियोजन आणि वित्त विभागास करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कागलडोह (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील स्वस्त धान्य दुकानदाराने केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(४७) ११५०१९ (१५-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कागलडोह (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील स्वस्त धान्य दुकानदाराने स्वस्त धान्याचे स्वत:चे दरपत्रक तयार करुन जादा दराने धान्य विकण्यासह खुल्या बाजारात शासकीय धान्याचा काळाबाजार करीत असल्याबाबतची तक्रार पुरवठा निरिक्षक चिखलदरा यांचेकडे दिनांक १० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, संबंधीत दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१८-०५-२०१८) :** (१) होय, खरे आहे.
(२) व (३) तक्रारीच्या अनुषंगाने पुरवठा निरिक्षक, चुर्णी यांनी श्रीमती जे.जी. कवळे रास्तभाव दुकानाची तपासणी दि.११/१२/२०१७ रोजी केली आहे. तहसिलदार, चिखलदरा यांनी दि.१२.१२.२०१७ रोजी सादर केलेल्या तपासणी अहवालानुसार सदर रास्तभाव दुकानदार

धान्याची जादा दराने विक्री करतात, धान्याच्या विक्रीच्या नोंदी रजिस्टरवर घेण्यात येत नाही. तसेच सदर रास्तभाव दुकानामध्ये प्रथम दर्शनी गंभीर स्वरुपाचे दोष असल्याचे आढळून असल्याने जिल्हा पुरवठा अधिकारी अमरावती यांच्या दि.२२/१२/२०१७ रोजीच्या आदेशान्वये सदर रास्तभाव दुकान पुढील आदेशापर्यंत निलंबित करण्यात आले आहे. तथापी उपआयुक्त (पुरवठा) अमरावती यांनी त्यांच्या दि. २ एप्रिल, २०१८ रोजीच्या आदेशान्वये सदर रास्तभाव दुकानाच्या निलंबन आदेशास स्थगिती दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भारतीय विचार साधना या प्रकाशनाकडून शिक्षण विभागामार्फत अवाजवी दराने खरेदी करण्यात आलेल्या पुस्तकांबाबत**

**(४८) ११६०१७ (०६-०४-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भारतीय विचार साधना या प्रकाशनाकडून शिक्षण विभागामार्फत अवाजवी दराने खरेदी करण्यात आलेल्या पुस्तकांचे गठ्ठे गायब करण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०५-२०१८) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पळाखेडे बुद्रुक (ता.जामनेर, जि.जळगांव) शहरात भुयारी गटाराच्या कामाकरिता परराज्यातून आलेल्या शाळाबाहय मुलांकरिता स्थलांतरीत शाळेचे उद्घाटन करण्यात आल्याबाबत**

**(४९) ११६१५६ (०६-०४-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पळाखेडे बुद्रुक येथे जामनेर (जि.जळगांव) शहरातील भुयारी गटाराच्या कामाकरिता गुजरात, मध्यप्रदेश व राजस्थान येथून आलेल्या २०० कुटुंबातील शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षण करुन त्यांच्यांकरिता दिनांक ३ जानेवारी, २०१८ वा त्या सुमारास स्थलांतरी शाळेचे उद्घाटन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियोजनाचा अभाव व दुर्लक्षितपणामुळे हे विद्यार्थी दुपारच्या भोजनापासून वंचित राहिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शालेय पोषण कक्ष स्थापन करणेबाबत**

**(५०) ११६३५८ (०६-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एक कोटीहून अधिक विद्यार्थी शालेय पोषण आहार योजनेचा लाभ घेत असून सदर योजनेच्या अंमलबजावणीमधे सुसूत्रता आणण्यासाठी राज्यस्तरावर स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने स्वतंत्र कक्ष स्थापन करून एकूण किती पदे भरण्यात आली आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्राथमिक शिक्षण संचालनायल स्तरावर स्वतंत्र कक्ष स्थापन करुन कक्षासाठी लागणारी आवश्यक पदे भरण्याबाबतची कार्यवाही आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

**मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर**
**मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.**